# महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३

# अनुक्रमणिका


| कलमे | उद्देशिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. .. | ०४ |
| २ | व्याख्या | ०५ |
| ३ | कल्याण निधी | ०८ |
| ४ | मंडळ | ०९ |
| ५ | अनर्हता व (पदावरून) काढून टाकणे | १२ |
| ६ | सदस्याने पदाचा राजीनामा देणे आणि नैमित्तिकरित्या रिकाम्या होणाऱ्या जागा भरणे | १२ |
| ६अअ | समित्या नेमण्याचा अधिकार | १३ |
| ६अ | न दिलेल्या संचित रकमा आणि त्याबाबत करण्यात आलेल्या मागण्या | १३ |
| ६बब | अंशदाने | १६ |
| ६ब | मागणीची नोटीस दिल्यानंतर, न दिलेल्या संचित रकमांवरील किंवा दंडावरील व्याज .. .. .. .. .. .. .. .. | १८ |
| ७ | निधी निहित होणे व त्याचे उपयोजन .. .. .. .. .. .. | १९ |
| ८ | कर्ज घेण्याचा मंडळाचा अधिकार .. .. .. .. .. | २१ |
| ९ | निधीची गुंतवणूक .. .. .. .. .. | २१ |
| १० | राज्य शासनाने मंडळास निर्देश देणे .. .. .. .. .. | २१ |
| ११ | कल्याण आयुक्तांची नेमणूक व त्यांचे अधिकार .. .. .. | २१ |
| १२ | निरीक्षकांची नेमणूक .. .. .. .. .. .. .. | २२ |
| १३ | कामगार आयुक्तांच्या अधीन असलेला विद्यमान कर्मचारी वर्ग सामावून घेणे .. .. .. .. .. .. .. .. .. .. | २३ |
| १४ | मंडळाने लिपिकवर्ग व इतर कर्मचारीवर्ग यांची नेमणूक करणे | २४ |
| १५ | मंडळाच्या कर्मचारी वर्गातील कोणत्याही व्यक्तीस काढून टाकण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. .. .. .. .. .. | २४ |

| | | |
|---|---|---|
| २५ | अभिलेख इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार .. .. .. .. .. .. .. | २४ |
| १७ | मंडळास द्यावयाच्या रकमा वगैरे वसूल करण्याची पद्धत .. .. | २५ |
| १७अ | निरीक्षकाला त्याची कर्तव्य पार पाडताना तपासणीमध्ये अडथळा आणल्याबद्दल किंवा कागदपत्रे वगैरे सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती .. .. .. .. .. .. .. .. .. | २५ |
| १७ब | अधिकारितेसंबंधी तरतुदी .. .. .. .. .. .. .. | २६ |
| १८ | मंडळाचे अधिक्रमण .. .. .. .. .. | २६ |
| १९ | नियम .. .. .. .. .. .. | २७ |
| २० | मंडळाचे सदस्य, कल्याण आयुक्त, निरीक्षक व मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे लोकसेवक असणे .. .. .. .. .. | २९ |
| २१ | सदभावनापूर्वक काम करण्याऱ्या व्यक्तीचे संरक्षण .. .. .. | २९ |
| २२ | सूट .. .. .. .. .. .. .. | २९ |
| २३ | सन १९३६ चा अधिनियम ४ याच्या कलम ८ ची सुधारणा | ३० |

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०
[मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३] *
[१७ जून १९५३]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :
सन १९५६ चा मुंबई अधिनियम १६.
मुंबई कामगार कल्याण मंडळ (पुनर्घटना) आदेश १९५९
मुंबई कामगार कल्याण मंडळ (पुनर्रचना) आदेश १९६०
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३६.
सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम २२.
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम १६.
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम २ [१ जुलै १९७७]**
सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४.

महाराष्ट्र राज्यातील कामगार कल्याण संवर्धक कार्यांना अर्थसहाय्य देण्याकरिता, अशी कार्ये चालविण्याकरिता आणि इतर विवक्षित प्रयोजनांकरिता एक निधी स्थापन करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम;

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील कामगार कल्याण संवर्धक कार्यांना अर्थसहाय्य देण्याकरिता, अशी कार्ये चालविण्याकरिता व इतर विवक्षित प्रयोजनांकरिता निधी स्थापन करणे इष्ट आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ असे म्हणावे.
(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे

(३) तो राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या बाबतीत नेमील अशा क्षेत्रात व अशा तारखेस अंमलात येईल.

<u>व्याख्या</u>. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधीनियमात;

(१) "<u>मंडळ</u>" म्हणजे कलम ४ अन्वये रचना करण्यात आलेले महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,

(१अ) "<u>अंशदान</u>" म्हणजे कलम ६ ब-ब च्या तरतुदींनुसार मंडळास देय असलेली रक्कम

(२) "<u>कर्मचारी</u>" म्हणजे प्रत्यक्षपणे मालकाकडून किंवा कंत्राटदारामार्फत किंवा इतर कोणत्याही एजन्सीमार्फत एखाद्या व्यापारी संस्थेत कोणतेही कसबी किंवा बिनकसबी अंगमेहनतीचे, कारकुनी, पर्यवेक्षकीय किंवा तांत्रिक काम करण्यासाठी मजुरीने किंवा बक्षिस देऊन कामावर लावलेली कोणतीही व्यक्ती;

[परंतु तीत,

(एक) जिला मुख्यत: व्यवस्थापकीय कामासाठी नोकरीत घेतले आहे, किंवा

(दोन) जिला पर्यवेक्षकीय कामासाठी नोकरीत घेतले असून तिला दरमहा तीन हजार पाचशे रुपयांहून अधिक वेतन मिळत आहे किंवा एकतर, पदास संलग्न असलेल्या कर्तव्याच्या स्वरुपात अनुसरून किंवा तिच्याकडे निहित करण्यात आलेल्या अधिकारांमुळे जी मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय स्वरूपाच्या अधिकारांचा वापर करीत आहे किंवा तशी कर्तव्ये पार पाडीत आहे, किंवा

(तीन) शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये जिला शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीत घेण्यात आले आहे.

अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होणार नाही."]

(३) "<u>मालक</u>" म्हणजे एखाद्या व्यापारी संस्थेत प्रत्यक्षपणे किंवा दुसऱ्या व्यक्तीमार्फत, स्वत:च्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, एक

किंवा अनेक कर्मचाऱ्यांना कामावर लावणारी कोणतीही व्यक्ती; आणि तीत पुढील व्यक्तींचा समावेश होतो -

(एक) कारखाने अधिनियम, १९४८, याचे कलम ७(एक)(फ) अन्वये कारखान्यात व्यवस्थापक या नावाने ओळखण्यात येणारी कोणतीही व्यक्ती;

(दोन) कोणत्याही व्यापारी संस्थेत, कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यास किंवा वेतन देण्यास मालकास जबाबदार असणारी कोणतीही व्यक्ती;

(४) "व्यापारी संस्था" म्हणजे –

(एक) कारखाना ;

(दोन) ट्राम मार्ग किंवा मोटार बस सेवा किंवा ज्यास मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१ लागू होतो असा मोटार परिवहन उपक्रम; आणि

(तीन) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ च्या अर्थानुसार जी कोणतीही संस्था पाच किंवा अधिक व्यक्तींची नेमणूक करीत असेल किंवा जिने मागील बारा महिन्यांतील कामाच्या कोणत्याही एका दिवशी पाच किंवा अधिक व्यक्तींची नेमणूक केली असेल अशी कोणतीही संस्था त्यात ज्यांना, त्या अधीनियमाच्या कलम ४ च्या परंतुकान्वये अंशत: किंवा पूर्णत: सूट देण्यात आली आहे, अशा व्यापारी संस्थेचा समावेश होतो. "

परंतु त्यानंतर कोणत्याही वेळी व्यक्तींची संख्या पाच पेक्षा कमी झाली तरीसुद्धा, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अशी कोणतीही संस्था व्यापारी संस्था म्हणून चालू राहील :

परंतु आणखी असे की, सलग तीन महिन्यांच्या काळात संस्थेत नेमलेल्या व्यक्तींची संस्था पाच पेक्षा कमी असेल तर अशी संस्था, उक्त तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतरच्या लगतच्या महिन्याच्या

सुरवातीपासून, या अधीनियमाच्या प्रयोजनार्थ व्यापारी संस्था असण्याचे बंद होईल, परंतु ती अशा प्रकारे बंद झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत मालकाने डाक नोंदणीद्वारे त्यासंबंधीची वस्तुस्थिती राज्य शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्यास कळविली पाहिजे]

[स्पष्टीकरण : शंका दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, एखाद्या संस्थेच्या वेगवेगळ्या शाखा किंवा विभाग असतील त्याबाबतीत, अशा सर्व शाखा किंवा विभाग हे, त्याच संस्थेचे भाग असल्याचे मानण्यात येईल – मग ते एकाच जागी असोत किंवा वेगवेगळ्या जागी असोत]

(५) "<u>कारखाना</u>" म्हणजे कारखाने अधिनियम, १९४८ याच्या कलम २ (ड) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला कारखाना, आणि यात ज्या ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ति कामावर लावलेल्या असतील किंवा काम करीत असतील, आणि

(एक) ज्या ठिकाणी विजेच्या सहाय्याने कोणतीही निर्मिती प्रक्रिया केली जात असेल किंवा सर्वसाधारणपणे अशाप्रकारे करण्यात येत असेल;

(दोन) उक्त अधीनियमाच्या कलम ८५ अन्वये जो कारखाना म्हणून समजण्यात येत असेल अशा कोणत्याही जागेचा समावेश होतो;]

(६) "<u>निधी</u>" म्हणजे कलम ३ अन्वये स्थापन केलेला कामगार कल्याण निधी

(७) "<u>स्वतंत्र सदस्य</u>" म्हणजे, ज्याचा कोणत्याही व्यापारी संस्थेच्या व्यवस्थापनाशी संबंध येत नसेल किंवा जो कर्मचारी नसेल असा मंडळाचा सदस्य, म्हणून नामनिर्देशित केलेल्या शासकीय अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(८) "<u>निरीक्षक</u>" म्हणजे कलम १२ अन्वये नेमलेला निरीक्षक

(९) “विहित” म्हणजे या अधिनीयमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले

(१०) “न दिलेल्या संचित रकमा” म्हणजे कायद्याने देय असलेले वेतन व उपदान धरून परंतु कामगार भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ अन्वये स्थापन केलेल्या भविष्य निर्वाह निधीत एखाद्या मालकाने जे कोणतेही अंशदान दिले असेल त्या अंशदानाच्या रकमेचा त्यात समावेश न करता कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या परंतु या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर, ज्या तारखेस त्या देय झाल्या त्या तारखेपासून, तीन वर्षाच्या मुदतीत त्यांना न दिलेल्या सर्व रकमा;

(११) “वेतन” म्हणजे वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ यांचे कलम २(सहा) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वेतन, आणि त्यात बोनस देण्याबाबत अधिनियम १९६५ अन्वये देय असलेल्या बोनसचा समावेश होईल.

(१२) “कल्याण आयुक्त” म्हणजे कलम ११ अन्वये नेमलेला कल्याण आयुक्त

२-अ [अधिनियमातील विवक्षित निर्देशांचा अर्थ लावणे.] हे कलम सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३६ च्या कलम ६ अन्वये वगळण्यात आले.

कल्याण निधी.

३. (१) राज्य शासनाने‘कामगार कल्याण निधी’या नावाचा एक निधी स्थापन केला पाहिजे आणि त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा किंवा कोणताही करार किंवा लेख यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, न देण्यात आलेल्या सर्व संचित रकमा, विहित करण्यात येतील अशा कालांतराने मंडळास दिल्या पाहिजेत; कलम ६-अ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने त्याबद्दल दाव्यांचा निर्णय करण्यात येईतोपर्यंत मंडळाने उक्त रकमांचा स्वतंत्र हिशेब ठेवला पाहिजे आणि पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या इतर रकमांचा निधीत भरणा केला पाहिजे.

(२) निधी पुढील गोष्टींचा मिळून होईल --

(अ) कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेल्या दंडाच्या सर्व रकमा;

(ब) कलम ६-अ अन्वये ज्या निधीकडे हस्तांतरित करण्यात आल्या असतील अशा न दिलेल्या संचित रकमा

(बब) कलम ६-ब अन्वये दंडादाखल दिलेले कोणतेही व्याज;

(बबब) कलम ६-बब अन्वये दिलेले कोणतेही अंशदान;

(क) स्वेच्छेने दिलेल्या कोणत्याही देणग्या;

(ड) कलम ७, पोट-कलम (५) अन्वये हस्तांतरित केलेला कोणताही निधी

(इ) कलम ८ अन्वये कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम :

(फ) राज्य शासनाने दिलेले कोणतेही कर्ज, सहायक अनुदान किंवा अर्थसहाय्य

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमा विहित करण्यात येतील अशा अभिकरणांकडून, अशा कालांतराने व अशा रीतीने देण्यात किंवा गोळा करण्यात येतील आणि निधीचे हिशेब विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवण्यात येतील व त्यांची तपासणी करण्यात येईल.

<u>मंडळ</u>

४. (१) राज्य शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सबंध महाराष्ट्र राज्याकरिता, निधीची व्यवस्था ठेवण्याच्या प्रयोजनासाठी, आणि या अधिनियमान्वये किंवा तदनुसार मंडळाकडे सोपवून देण्यात आली असतील अशी इतर कामे पार पाडण्यासाठी मंडळाची रचना केली पाहिजे. मंडळ सव्वीसपेक्षा अधिक नसतील इतक्या, पुढील सदस्यांचे मिळून होईल:-

(अ) विहित करण्यात येतील अशा संख्येइतके राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे, मालकांचे व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी :

परंतु मालक व कर्मचारी या दोघांनाही मंडळावर समान प्रतिनिधित्व असेल;

(ब) विहित करण्यात येतील अशा संख्येइतके, राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले स्वतंत्र सदस्य; आणि

(क) स्त्रियांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विहित करण्यात येतील अशा संख्येइतके राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले स्वतंत्र सदस्य

(ड) प्रधान सचिव किंवा सचिव (वित्त) किंवा त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ति हे पदसिद्ध-सदस्य असतील; आणि

(ई) प्रधान सचिव किंवा सचिव (कामगार) किंवा त्याने माननिर्देशित केलेली व्यक्ति, हे पदसिद्ध सदस्य असतील

(२) मंडळाच्या सदस्यांनी मंडळाचा सभापती म्हणून आपल्या स्वतंत्र सदस्यांमधून एकाची निवड केली पाहिजे

(३) या अधिनियमान्वये अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, मंडळाच्या सदस्यांच्या पदाची मुदत, ज्या तारखेस त्यांची नावे शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात आली असतील त्या तारखेपासून तीन वर्ष असेल.

(४) मंडळाच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते, तसे भत्ते असल्यास ते विहित करण्यात येतील असे असतील.

(५) मंडळ हे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ या नावाचे एक निगम निकाय असेल, त्याची परंपरा अखंड असेल व त्याची एक सामाईक मुद्रा असेल आणि त्यास, जंगम किंवा स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार असेल, व त्यास उक्त नावाने दावा लावता येईल, तसेच त्या नावाने त्याजवर दावा लावता येईल.

(६) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यासाठी मंडळाची यथोचितरीत्या स्थापना करण्यात येईपर्यंत, मुंबई कामगार कल्याण निधी (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम १९६१ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, राज्याच्या कोणत्याही क्षेत्रात कार्य करीत असलेले आणि चालविले जात असलेले विद्यमान मंडळ, त्या क्षेत्रात कार्य चालू ठेवील व त्या क्षेत्रात त्याचा अंमल चालू राहील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी असे मंडळ हे त्या क्षेत्रासाठी

असलेले मंडळ असेल आणि पोट-कलम (१) अन्वये सबंध महाराष्ट्र राज्यासाठी मंडळाची स्थापना करण्यात आल्यानंतर –

(अ) असे विद्यमान मंडळ विसर्जित होईल आणि त्याचे सदस्य आपली पदे रिकामी करतील;

(ब) विद्यमान मंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता आणि निधी अशा रीतीने स्थापन केलेल्या मंडळाकडे निहित होतील आणि विद्यमान मंडळास वसूल करता येतील अशा सर्व देय रकमा, अशा रीतीने स्थापन करण्यात आलेल्या मंडळास वसूल करता येतील;

(क) विद्यमान मंडळाने किंवा त्याविरुद्ध बजावण्याचे सर्व अधिकार आणि दायित्वे ही, अशा रीतीने स्थापन करण्यात आलेल्या मंडळास किंवा त्या मंडळाविरुद्ध बजावता येतील आणि कोणत्याही न्यायालयापुढे किंवा न्यायाधिकरणापुढे असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत विद्यमान मंडळ पक्षकार असेल त्याबाबतीत, अशा रीतीने स्थापन करण्यात आलेल्या मंडळास, त्या कार्यवाहीतील पक्षकार म्हणून त्याच्या जागी दाखल करण्यात आले आहे असे मानण्यात येईल; आणि

(ड) विद्यमान मंडळाचे कल्याण आयुक्त आणि इतर अधिकारी व नोकर हे अशा रीतीने स्थापन करण्यात आलेल्या मंडळाचे कल्याण आयुक्त आणि अधिकारी व नोकर म्हणून असण्याचे चालू राहील; परंतु कल्याण आयुक्त आणि इतर अधिकारी व नोकर यांच्या अशा रीतीने स्थापन केलेल्या मंडळाखालील सेवेच्या शर्ती आणि अटी या सक्षम प्राधिकाऱ्याकडून योग्य रीतीने बदलण्यात येईतोपर्यंत, विद्यमान मंडळाच्या सेवेत असताना, त्यांच्या सेवेच्या संबंधात ज्या शर्ती व अटी अनुदेय होत्या, त्या शर्ती आणि अटींपेक्षा कमी लाभदायक असणार नाहीत.

४-अ. कर्नाटक क्षेत्रासंबंधात मंडळाच्या अधिकारांचा म्हैसूर शासनाने विवक्षित मुदतीसाठी वापर करणे हे कलम सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३६ याचे कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

<u>अनर्हर्ता व पदावरून काढून टाकणे-</u>

५. (१) पुढील कोणतीही व्यक्ति मंडळाचा सदस्य म्हणून निवडण्यात येता कामा नये किंवा सदस्य म्हणून राहता कामा नये

(अ) मंडळाचा वेतनी अधिकारी असेल अशी कोणतीही व्यक्ति; अथवा

(ब) जिल्हा न्यायालयाने कोणत्याही वेळी नादार ठरविले आहे किंवा ठरविले होते किंवा जिने आपल्या कर्जाची परतफेड करण्याचे तहकूब केले असेल किंवा जिने आपल्या धनकोबरोबर तडजोड केली असेल अशी व्यक्ति; अथवा

(क) वेडी असल्याचे आढळून आले असेल अशी व्यक्ति किंवा जी विकल मनाची झाली असेल अशी व्यक्ति; अथवा

(ड) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव होणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले आहे किंवा सिद्धापराध ठरविण्यात आले होते अशी व्यक्ती.

(२) राज्य शासनास, पुढील कोणत्याही सदस्यास, पदावरून काढून टाकता येईल :-

(अ) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनर्हतापैकी कोणतीही अनर्हता प्राप्त आहे किंवा होती अशी व्यक्ती; अथवा

(ब) मंडळाच्या परवानगीवाचून मंडळाच्या लागोपाठ तीनपेक्षा अधिक सभांना अनुपस्थित राहिली असेल अशी व्यक्ती.

<u>पदाचा राजीनामा देणे आणि नैमित्तिकरित्या रिकाम्या होणाऱ्या जागा भरणे-</u>

६.] (१) एखाद्या सदस्यास, राज्य शासनाला लेखी नोटिस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि असा राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर, अशा सदस्याने आपले पद रिकामे केले आहे असे मानण्यात येईल.

(२) एखाद्या सदस्याची नैमित्तिकरीत्या रिकामी झालेली जागा संबंधित प्राधिकाऱ्याने, सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर भरली पाहिजे आणि अशा

रीतीने नामनिर्देशित केलेल्या सदस्याने, त्याच्या पूर्वीच्या सदस्याच्या पदाचा मुदतीपैकी राहिलेल्या मुदतीपर्यंत पद धारण केले पाहिजे.

(३) मंडळात कोणतीही जागा रिकामी आहे किंवा मंडळाच्या रचनेत कोणताही दोष आहे याच केवळ कारणावरून, मंडळाच्या कोणत्याही कृत्यास किंवा कार्यवाहीस हरकत घेता येणार नाही.

<u>समित्या नेमण्याचा अधिकार-</u>

६-अअ.] आपली कामे पार पाडण्यात मंडळास सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी आणि त्याचप्रमाणे कलम-७, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणतीही बाब अमंलात आणण्यासाठी, मंडळास एक किंवा अधिक समित्या स्थापन करता येतील. त्यापैकी प्रत्येक समितीवर मंडळाचा निदान एकतरी सदस्य असेल.

<u>न दिलेल्या संचित रकमा आणि त्याबाबत करण्यात आलेली मागणी-</u>

६-अ.] (१) न दिलेल्या सर्व संचित रकमा या सोडून दिलेली मालमत्ता आहे असे मानण्यात येईल.

(२) ज्या कोणत्याही न दिलेल्या संचित रकमा कलम ३ च्या तरतुदीनुसार मंडळास देण्यात आल्या असतील, त्या रकमा मंडळास अशा रीतीने देण्यात आल्यावर मालक, मंडळास दिलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंतच अशा रकमा कर्मचाऱ्यास देण्यासंबंधातील आपल्या जबाबदारीतून मुक्त होईल आणि उपरोक्त मर्यादेपर्यंत कर्मचाऱ्यास रकमा देण्याची जबाबदारी या कलमाच्या अनुवर्ती तरतुदींच्या अधीन राहून, मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(३) कोणत्याही न दिलेल्या संचित रकमा मंडळास देण्यात आल्यानंतर शकय तितक्या लवकर, मंडळाने (विहित करण्यात येईल असा तपशील असलेल्या) नोटीशीद्वारा –

(अ) न दिलेल्या संचित रकमा ज्या कारखान्यात किंवा व्यापारी संस्थेत अर्जित करण्यात आल्या असतील त्या कारखान्याच्या किंवा व्यापारी संस्थेच्या सूचना फलकावर अशी निटीस लावून; आणि

(ब) (वगळण्यात आला)

(क) तसेच न दिलेल्या संचित रकमा ज्या कारखान्यात किंवा व्यापारी संस्थेत अर्जित करण्यात आल्या असतील तो कारखाना किंवा ती व्यापारी संस्था ज्या भागात असेल त्या भागात प्रसारित होणाऱ्या कोणत्याही दोन वृत्तपत्रात आणि त्या भागात सामान्यपणे समजल्या जाणाऱ्या भाषेत अशी नोटीस प्रसिद्ध करून किंवा केलेल्या मागणीची रक्कम लक्षात घेऊन, विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने ती प्रसिद्ध करून, कर्मचाऱ्यांना देणे असलेल्या कोणत्याही रकमेबाबत त्यांनी केलेल्या मागण्या सादर करण्याबाबत विनंती केली पाहिजे. अशी नोटीस, न दिलेल्या संचित रकमा, मंडळास देण्यात आल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीसाठी, प्रत्येक वर्षाच्या जून व डिसेंबर महिन्यात, उपरोक्त रीतीने देण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) मध्ये उल्लेखिलेली नोटीस त्या पोट-कलमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे देण्यात आली होती किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवला तर अशी नोटीस अशा रीतीने देण्यात आली होती अशा अर्थाचे मंडळाने दिलेले प्रमाणपत्र निर्णायक असेल.

(५) अशा मागणीच्या संबंधातील नोटीस प्रथमतः प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून चार वर्षांच्या आत अशा नोटीसीच्या अनुरोधाने किंवा अन्यथा, एखादी मागणी करण्यात आली तर, मंडळाने अशी मागणी वेतन देण्याबाबत अधिनियम १९३६ याच्या कलम १५ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या आणि ज्या भागात कारखाना किंवा व्यापारी संस्था असेल त्या भागात अधिकारिता असणाऱ्या प्राधिकरणाकडे हस्तांतरित केली पाहिजे आणि अशा प्राधिकरणाने त्या मागणीची न्याय चौकशी करून त्यावर निर्णय दिला पाहिजे. अशा मागणीची सुनावणी करताना अशा प्राधिकरणास त्या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार असतील आणि त्याने, त्या अधिनियमाच्या तरतुदींची अमलबजावणी

करताना जी कार्यपद्धती अनुसरण्यात येत असेल तीच कार्यपद्धती (जेथवर ती लागू करणे शक्य असेल तेथवर) अनुसरली पाहिजे.

(६) जर अशी कोणतीही मागणी कायदेशीर असून त्यामुळे रक्कम मिळण्यासंबंधीचा अधिकार प्रस्थापित झाला आहे अशी उपरोक्त प्राधिकरणाची खात्री होईल तर, ज्या न दिलेल्या संचित रकमेच्या संबंधात मागणी केली असेल ती न दिलेली संचित रक्कम सोडून देण्यात आलेली मालमत्ता मानली जाणार नाही असा निर्णय प्राधिकरणाने दिला पाहिजे आणि देणे असलेल्या ज्या रकमांबाबत मागणी करण्यात आली असेल त्या संपूर्ण रकमा किंवा उक्त प्राधिकरण त्याचा जो भाग योग्य रीतीने देणे झालेला आहे असे ठरवील तो भाग, कर्मचाऱ्याला देण्याबाबत मंडळास आदेश दिला पाहिजे आणि मंडळ तदनुसार अशा रकमा देईलः

परंतु त्या मागणीच्या संबंधात, कलम ३ चे पोट-कलम (१) अन्वये मंडळास न दिलेली संचित रक्कम म्हणून जी कोणतीही रक्कम देण्यात आली असेल त्या रकमेपेक्षा अधिक रक्कम देण्यास मंडळ पात्र असणार नाही.

(७) रक्कम मिळणेबाबत केलेली मागणी नामंजूर करण्यात आली तर कर्मचाऱ्यास बृहन्मुंबईत लघुवाद न्यायालयाकडे आणि इतरत्र जिल्हा न्यायालयाकडे अपील करण्याचा हक्क असेल आणि मंडळाने आपिलात देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन केले पाहिजे. प्राधिकरणाने निर्णय दिल्यापासून साठ दिवसांच्या आत अपील केले पाहिजे.

(८) उपरोक्त आपिलास अधीन राहून प्राधिकरणाचा निर्णय आणि यथास्थिती, लघुवाद न्यायालयाने किंवा जिल्हा न्यायालयाने, आपिलात दिलेला निर्णय हा, रक्कम मिळण्याबाबत असलेल्या हक्कासंबंधी रक्कम देण्याच्या मंडळाच्या जबाबदारीसंबंधी आणि तसेच अशी रक्कम असल्यास त्या रकमेच्या बाबतीत अखेरचा आणि निर्णायक असेल.

(९) पोट-कलम (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणतीही मागणी करण्यात आली नाही किंवा एखादी मागणी प्राधिकरणाने किंवा अपील केले असता न्यायालयाने उपरोक्तप्रमाणे यथोचितरीत्या नामंजूर केली तर अशा मागणीच्या संबंधातील, न दिलेल्या संचित रकमा ह्या, स्वामिहीन संपत्ती असल्याप्रमाणे, राज्य

शासनास प्राप्त होतील आणि त्या राज्य शासनाकडे निहित होतील, आणि त्यानंतर अशा रकमा, त्यांच्या आणखी हस्तांतरणाशिवाय, निधीकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत आणि त्या निधीचा भाग झाल्या आहेत असे मानण्यात येईल.

अंशदाने-

६ बब. (१) एखाद्या संस्थेतील एखाद्या कर्मचाऱ्याच्या संबंधात या अधिनीयमान्वये देय असलेले अंशदान, हे मालकाकडून देय असलेले अंशदान (ज्याचा यात यापुढे मालकाचे अंशदान असा निर्देश करण्यात आला आहे), अशा कर्मचाऱ्याकडून देय असलेले अंशदान (ज्याचा यात यापुढे कर्मचाऱ्याचे अंशदान असा निर्देश करण्यात आला आहे) आणि राज्य शासनाकडून देय असलेले अंशदान मिळून बनलेले असेल आणि ते मंडळास देण्यात येईल आणि ते निधीचा भाग बनेल.

(२) प्रत्येक कर्मचाऱ्याच्या संबंधात प्रत्येक सहा महिन्यांनी देय होणाऱ्या अंशदानाची रक्कम ही, अशा कर्मचाऱ्याचे नाव, अनुक्रमे दिनांक ३० जून आणि ३१ डिसेंबर रोजी, संस्थेच्या नोंदणी पुस्तकात असेल तरच-

(अ)(एक) दरमहा तीन हजार रुपयांपर्यंत आणि तीन हजार वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहा रुपये असेल; आणि

(दोन) तीन हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बारा रुपये असेल

परंतु शासनास मंडळाकडून प्रस्ताव प्राप्त होताच, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कर्मचाऱ्यांच्या आशा रकमेच्या अंशदानाचा दर तीन वर्षातून एकदा आशा रीतीने वाढवता येईल की, जेणेकरून अशी वाढ, अंशदानाच्या चालू दराच्या ३० टक्क्याहुन अधिक होणार नाही;

(ब) मालकाच्या बाबतीत, खंड (अ) च्या उप-खंड (एक) आणि (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्यासंबंधात प्रत्येक सहा महिन्यांनी देय होणारी रक्कम ही कर्मचाऱ्याकडून देय असलेल्या अंशदानाच्या रकमेच्या तिप्पट असेल.."

(३) प्रत्येक मालक १५ जुलै आणि १५ जानेवारीपूर्वी, मालकाचे अंशदान आणि कर्मचाऱ्याचे अंशदान पोट-कलम २ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे, अशी दोन्ही अंशदाने मंडळास देईल.

(४) इतर कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या आणि कोणत्याही नियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, मालकास अशा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या बाबतीत, उक्त कर्मचाऱ्याचे अंशदान, त्याच्या वेतनात कपात करून, अन्य कोणत्याही रीतीने नव्हे—--वसूल करता येईल, आणि अशी कपात, वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ द्वारे किंवा तदन्वये प्राधिकृत कपात असल्याचे समजण्यात येईल:

परंतु अशी कोणतीही कपात, अशा कर्मचाऱ्याने देय असलेल्या अंशदानाच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये तसेच ती जून किंवा डिसेंबर या महिन्यांच्या वेतानाव्यतिरिक्त, इतर कोणत्याही वेतनातून करता कामा नये:

परंतु आणखी असे की, अनवधानाने किंवा अन्यथा एखाद्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून उपरोक्त महिन्यामध्ये कोणतीही कपात करण्यात आली नाही तर, या अधिनीयमान्वये नेमलेल्या निरीक्षकाच्या लेखी परवानगीने, अशा कर्मचाऱ्याच्या नंतरच्या कोणत्याही महिन्याच्या किंवा महिन्यांच्या वेतनातून अशी कपात करता येईल.

(५)एतद्विरुद्ध कोणतीही संविदा असली तरीही, कोणत्याही मालकाने एखाद्या कर्मचाऱ्यास देय असलेल्या कोणत्याही वेतनातून मालकाचे अंशदान वजा करता कामा नये किंवा अन्यथा ते कर्मचाऱ्याकडून वसूल करता कामा नये.

(६)या कलमान्वये एखाद्या कर्मचाऱ्याच्या वेतनातून एखाद्या मालकाने यथोचितरीत्या वजा केलेली कोणतीही रक्कम, ती ज्या अंशदानाच्या संबंधात वजा करण्यात आली असेल ते अंशदान देण्याच्या प्रयोजनासाठीच त्या कर्मचाऱ्याने मालकाकडे सोपविली असल्याचे समजण्यात येईल.

(७)मालकाचे आणि कर्मचाऱ्याचे अंशदान मालकाने, चेकने, मनिओर्डरने किंवा रोख रकमेत मंडळास दिले पाहिजे आणि त्याने मंडळाकडे अंशदान भरणा करण्यासाठी होणारा खर्च सोसला पाहिजे.

(८)प्रत्येक व्यापारी संस्थेतील मालकाच्या अंशदानाची आणि कर्मचाऱ्याच्या संबंधातील कर्मचाऱ्याच्या अंशदानाची एकूण रक्कम दर्शविणारे विवरणपत्र, दरवर्षी जुलै आणि जानेवारी अखेरीनंतर शक्य तितक्या लवकर कल्याण आयुक्ताने, विहित नमुन्यात राज्य शासनाकडे सादर केले पाहिजे, कल्याण आयुक्तांकडून विवरणपत्र मिळाल्यावर राज्य शासनाने पोट कलम (२) च्या खंड (अ) च्या उप-खंड (एक) व (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या बाबतीत, ३१ डिसेंबर २००० ते ३१ मार्च २००३ या कालावधीकरिता कर्मचाऱ्यांच्या अंशादानाच्या निम्याइतकी रक्कम; आणि १ एप्रिल २००३ पासून कर्मचाऱ्यांच्या अंशादानाच्या दुपटी इतकी रक्कम अंशदान म्हणून मंडळास दिली पाहिजे.

<u>मागणीची नोटीस दिल्यानंतर न दिलेल्या संचित रकमांवरील किंवा दंडावरील व्याज-</u>

६-ब. १) जर एखाद्या मालकाने न दिलेल्या संचित रकमेची किंवा कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेल्या दंडाची कोणतीही रक्कम किंवा कलम ६-बब खालील मालकाच्या किंवा कर्मचाऱ्याच्या अंशदानाची रक्कम या अधीनियमाच्या तरतुदीनुसार किंवा तदन्वये, अशी रक्कम ज्या मुदतीत देणे त्यास आवश्यक आहे त्या मुदतीत दिली नाही तर कल्याण आयुक्तास, आशा मालकावर नोटिस बाजावून त्यास तीत निर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अशी रक्कम देण्याविषयी फर्माविता येईल. असा कालावधी अशी नोटिस बजावण्याच्या तारखेपासून तीन दिवसांहून कमी असणार नाही.

२)जर अशा मालकाने पुरेशा कारणावाचून, नोटीसीमध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत अशी कोणतीही रक्कम देण्यात कसूर केली तर त्याने मंडळास त्या रकमेशिवाय आणखी –

(अ) अदत्त संचित रकमा अथवा कर्मचाऱ्यांकडून वसूल केलेला दंड यांची कोणतीही रक्कम देण्यात कसूर केल्याच्या बाबतीत –

(एक) पहिल्या तीन महिन्यांकरिता नोटीशिनुसार ज्या अंतिम दिंनांकापर्यंत त्याने उक्त रक्कम द्यावयास पाहिजे होती त्या दिनांकानंतरच्या प्रत्येक पूर्ण महिन्यासाठी उक्त रकमेच्या शेकडा दीड टक्क्याप्रमाणे; आणि

(दोन) त्यानंतर ती रक्कम देण्यात तो कसूर करणे चालू ठेवील अशा मुदतीत प्रत्येक पूर्ण महिन्याकरिता त्या रकमेच्या शेकडा दोन टक्क्याप्रमाणे;

(ब) कलम ६-बब खालील, मालकांच्या व कर्मचाऱ्यांच्या अंशदानाची कोणतीही रक्कम देण्यात कसूर केल्याच्या बाबतीत –

(एक) पहिल्या तीन महिन्यांकरिता, कलम ६-बब च्या पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार, ज्या अंतिम दिंनांकापर्यंत त्याने उक्त रक्कम द्यावयास पाहिजे होती त्या दिनांकानंतरच्या प्रत्येक पूर्ण महिन्याकरिता उक्त रकमेच्या शेकडा दीड टक्क्याप्रमाणे आणि

(दोन) त्यानंतर, ती रक्कम देण्यात तो कसूर करणे चालू ठेवील अशा मुदतीत, प्रत्येक पूर्ण महिन्याकरिता, त्या रकमेच्या शेकडा दोन टक्क्याप्रमाणे, सरळव्याज दिले पाहिजे :

परंतु कल्याण आयुक्तास, विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, कोणत्याही कालावधीच्या बाबतीत, असा दंड पूर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल

निधी निहित होणे व त्याचे उपयोजन-

७. (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून व त्याच्या प्रयोजनाकरिता हा निधि, विश्वस्त या नात्याने मंडळाकडे विहित होईल व मंडळ तो धारण करील व त्याचे उपयोजन करील. निधीतील पैशाचा उपयोग कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ति त्यांच्या हितसंवर्धनासाठी राज्य शासन वेळोवेळी निर्दिष्ट करील त्या योजना पार पाडण्यासाठी, मंडळाकडून करण्यात आला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) च्या सामान्यतेस बाधा न आणता मंडळास पुढील गोष्टींवरील खर्च भागविण्यासाठी निधीतील पैशाचा उपयोग करता येईल.

(अ) वाचनालये व ग्रंथालये धरून सामूहिक व सामाजिक शिक्षण केंद्रे;

(ब) सामूहिक गरजा;

(क) खेळ व क्रीडा;

(ड) सहली, दौरे, व विश्रामधामे;

(इ) करमणूक व मनोरंजनाचे इतर प्रकार;

(फ)स्त्रिया व बेकार व्यक्ति यांच्यासाठी गृहोद्योग आणि दुय्यम व्यवसाय;

(ग) सामाजिक स्वरूपाची सामुदायिक कार्ये;

(ह) अधिनियमच्या प्रयोजनाकरिता नेमलेल्या कर्मचारी वर्गांचा पगार, भत्ते, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व उपदान आणि इतर कोणतेही उपांत लाभ धरून अधिनियमाच्या अंमलबजावणीचा खर्च; आणि

(आय) राज्य शासनाच्या मते ज्या योगे कामगारांचे राहणीमान उंचावेल व त्यांची सामाजिक परिस्थिति सुधारेल असे इतर उद्देश.

परंतु त्यावेळी अमंलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये जी कोणतीही उपाय योजना पार पाडणे मालकास आवश्यक असेल त्या उपाययोजनेला पैसा पुरविण्याकडे या निधीचा उपयोग करता येणार नाही :

परंतु, आणखी असे की, वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ मध्ये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, न दिलेल्या संचित रकमा व दंड यांचा मंडळाकडे भरणा केला पाहिजे व या अधिनियामान्वाये मंडळाकडून तो खर्च केला पाहिजे.

(३) मंडळास, राज्य शासनाच्या संमतीने राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही कामगार कल्याण कार्यासाठी मदत म्हणून, कोणत्याही मालकास, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा इतर कोणत्याही संस्थेस निधीतून अनुदान देता येईल.

(४) एखादा विशिष्ट खर्च निधी खाती खर्ची टाकता येण्याजोगा आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास ती बाब राज्य शासनाकडे विचारार्थ पाठवली पाहिजे आणि राज्य शासनाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(५) जर कोणत्याही व्यापारी संस्थेच्या कामगार कल्याण निधीचे मंडळाकडे यथोचितरीत्या हस्तांतरण करण्यात आले असेल तर, उक्त निधीतून आर्थिक मदत मिळत असलेले कोणतेही कार्य मंडळाने चालू ठेवणे कायदेशीर असेल.

<u>कर्ज घेण्याचा मंडळाचा अधिकार-</u>

८. राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने व या अधिनियमाच्या तरतुदींच्या आणि याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून मंडळास या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असलेली कोणतीही रक्कम वेळोवेळी कर्जाऊ घेता येईल.

<u>निधीची गुंतवणूक-</u>

९. या अधिनियमाच्या उद्देशपूर्तीसाठी अशा निधीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा लवकर विनियोग करणे शक्य नसेल तर, मंडळाने भारतीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम १८८२ याचे कलम २०, खंड (क) ते (घ) व (च) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रोख्यांपैकी कोणत्याही रोख्यात तो गुंतविला पाहिजे.

<u>राज्य शासनाने मंडळास निर्देश देणे-</u>

१०. अशा निधीतून करावयाच्या खर्चाच्या संबंधात किंवा अधिनियमाची इतर प्रयोजने पार पाडण्याकरिता, राज्य शासनास त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असतील असे निर्देश मंडळास देता येतील. अशा निर्देशांचे पालन करणे हे मंडळाचे कर्तव्य असेल.

<u>कल्याण आयुक्तांची नेमणूक व त्यांचे अधिकार-</u>

११. (१) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने मंडळाने कल्याण आयुक्तांची नेमणूक केली पाहिजे;

(२) कल्याण आयुक्त हा मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल;

(३) या अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींचे यथोचितरित्या पालन करण्यात येत आहे याबद्दल खात्री करून घेणे हे कल्याण आयुक्ताचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनाकरिता त्यास या अधिनीयमान्वये किंवा तदन्वये केलेल्या नियमान्वये मंडळाने घेतलेले निर्णय अंमलात आणण्याविषयीचा कोणताही आदेश धरून, अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे त्यास योग्य वाटतील, असे आदेश देण्याचा अधिकार असेल.

<u>निरीक्षकांची नेमणूक-</u>

१२. (१) निधीत भरावयाच्या रकमांच्या संबंधातील अभिलेख तपासण्यासाठी राज्य शासनाला निरीक्षकांची नेमणूक करता येईल. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अन्वये कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, स्थानिक प्राधिकारणाने किंवा राज्य शासनाने नेमलेले निरीक्षक हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ज्या व्यापारी संस्थांना हा अधिनियम लागू होतो त्यांच्या संबंधात, निरीक्षक असल्याचे समजण्यात येईल आणि या अधिनियमान्वये असा निरीक्षक ज्या स्थानिक क्षेत्रात आपली कामे पार पाडील ते स्थानिक क्षेत्र हे, उक्त अधिनियमान्वये त्याची ज्या क्षेत्रासाठी नेमणूक करण्यात आली असेल ते स्थानिक क्षेत्र असेल.

(२) कोणत्याही निरीक्षकास –

(अ) त्यास योग्य वाटेल अशी कोणतीही मदत लागल्यास तशी मदत घेऊन या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी कोणत्याही जागेत कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल.

(ब) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करता येईल.

<u>कामगार आयुक्तांच्या अधीन असलेला विद्यमान कर्मचारी वर्ग सामावून घेणे-</u>

१३. (१) राज्य शासन निर्देश देईल असा, कामगार आयुक्त, मुंबई, यांच्या नियंत्राखाली असलेला विद्यमान कर्मचारी वर्ग, मंडळ स्वीकारील व नोकरीवर ठेवील आणि अशा रीतीने स्वीकारलेली व नोकरीवर ठेवलेली प्रत्येक व्यक्ति, या अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अधीन असेल :

परंतु –

(अ) अशा नोकरीच्या मुदतीत, उक्त नोकरवर्गाचा पगार, रजा, सेवानिवृत्ती, भत्ते, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी व नोकरीच्या इतर शर्ती या मुंबई नागरी सेवा नियमाद्वारे किंवा राज्य शासन वेळोवेळी करील अशा इतर नियमांद्वारे विनियमित करण्यात येतील;

(आ) अशा प्रत्येक कर्मचाऱ्यास पदावनती करणाऱ्या, बडतर्फी करणाऱ्या किंवा नोकरीवरून काढून टाकणाऱ्या, दंड करणाऱ्या किंवा इतर कोणतीही शास्ती देणाऱ्या कोणत्याही आदेशाविरुद्ध, राज्य शासनाकडे अपील करण्याचा हक्क असेल :

परंतु आणखी असे की, अशा रीतीने स्वीकारलेल्या व्यक्तीस या अधिनियमान्वये मंडळाने नेमलेल्या कर्मचारी वर्गाच्या सेवेच्या शर्तीसंबंधी, या अधिनियमान्वये केलेले नियम आपणास लागू करावेत अशी विहित केलेल्या मुदतीत, इच्छा प्रदर्शित करून निवड करता येईल आणि अशा रीतीने निवड केल्यावर, पहिल्या परंतुकाच्या तरतुदी तिला लागू असण्याचे बंद होईल.

(२) मुंबई कामगार कल्याण निधी (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६१ अन्वये हा अधिनियम ज्या क्षेत्रास लागू करण्यात आला असेल अशा कोणत्याही क्षेत्रात, या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर, कामगार आयुक्त मुंबई, यांच्या नियंत्राखाली असलेल्या विद्यमान कर्मचाऱ्यांपैकी राज्य शासन निर्देश देईल तेवढे विद्यमान कर्मचारी, मंडळ स्वीकारील व त्यांना नोकरीवर ठेवील व अशा रीतीने स्वीकारलेली व नोकरीवर ठेवण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती पोट-कलम (१) मधील शर्ती व अटी

या सारख्याच शर्तीस व अटींस आणि पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या व त्या अन्वये केलेल्या नियमांच्या अधीन असेल.

<u>लिपिक वर्ग व इतर कर्मचारी वर्ग यांची नेमणूक करणे-</u>

१४.(१) ज्या कार्यासाठी निधीतून पैसा पुरविण्यात आला असेल ती कार्ये पार पाडण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी आवश्यक असेल असा लिपिकवर्ग व कार्यकारी कर्मचारी वर्ग नेमण्याचा मंडळाला अधिकार आहे.

परंतु अशा रीतीने नेमलेल्या कर्मचारी वर्गांचा खर्च व इतर प्रशासनिक खर्च निधीच्या वार्षिक उत्पन्नाच्या विहित केलेल्या टक्केवारीपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) राज्य शासनाच्या मान्यतेने आपल्या कर्मचाऱ्यांच्या (कल्याण आयुक्त व निरीक्षक याखेरीज इतर) सेवाप्रवेशाची पद्धत, त्यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती या संबंधी मंडळ विनियम करील :

परंतु असे विनियम करण्यात येईतोपर्यंत, अशा नोकरांच्या सेवेच्या शर्तींचे नियमन राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे केले जाईल.

<u>मंडळाच्या कर्मचारी वर्गातील कोणत्याही व्यक्तीस काढून टाकण्याचा राज्य शासनाचा अधिकार-</u>

१५. राज्य शासनाला, त्यास अयोग्य वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, मंडळाच्या सेवेतून काढून टाकण्याचा आणि ज्याच्या बाबतीत, मंडळाच्या सदस्यांपैकी एक-तृतीयांशापेक्षा अधिक सदस्य सहमत नसतील त्या बाबतीत, नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

<u>अभिलेख इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा अधिकार-</u>

१६. राज्य शासनास किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास मंडळाचे अभिलेख मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल आणि त्यास मंडळाच्या कामावर देखरेख ठेवता येईल.

<u>मंडळास द्यावयाच्या रकमा वगैरे वसूल करण्याची पध्दती-</u>

१७. या अधिनीयमान्वये मंडळास किंवा निधीस द्यावयाची कोणतीही रक्कम, वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाधा न आणता, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे, मंडळाच्या वतीने वसूल केली पाहिजे.

<u>निरीक्षकाला त्याची कर्तव्ये पार पाडताना तपासणीमध्ये अडथळा आणल्याबद्दल किंवा कागदपत्रे वगैरे सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती-</u>

१७-अ] जी कोणतीही व्यक्ती, निरीक्षकास, या अधिनीयमान्वये त्याच्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याची कर्तव्ये पार पाडताना जाणून बुजून अडथळा करील किंवा निरीक्षकाने मागणी केली असता या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार ठेवलेल्या कोणत्याही नोंदवह्या, अभिलेख किंवा इतर कागदपत्रे तपासणीसाठी सादर करण्यात कसूर करील, किंवा मागणी केली असता कोणत्याही अशा कागदपत्रांच्या खऱ्या प्रती पुरविण्यात कसूर करील अशा व्यक्तीस सिद्धपराध ठरविण्यात आले असता –

(अ) पहिल्या अपराधाबद्दल तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील; आणि

(ब) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधांबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

परंतु न्यायालयाच्या निकालपत्रात नमूद करावयाच्या तदविरुद्ध विशिष्ट व पुरेशा कारणांच्या अभावी अपराध्यास केवळ दंडाची शिक्षा देण्यात आली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, दंडाची रक्कम पन्नास रुपयांहून कमी असता कामा नये.

<u>अधिकारीतेसंबंधी तरतुदी-</u>

१७-ब] (१) इलाखा शहर दंडाधिकाराच्या किंवा पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेल्या कोणत्याही न्यायालयास, कलम १७-अ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्याय चौकशी करता येणार नाही.
(२) कल्याण आयुक्तांच्या पूर्व मंजुरीने निरीक्षकाव्यतिरिक्त कोणासही अशा अपराधाबद्दल खटला दाखल करता येणार नाही.
(३) कोणत्याही न्यायालयाने ज्या तारखेस असा अपराध करण्यात आला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबत तक्रार करण्यात आली नसेल तर, अशा अपराधाची दाखल घेता कामा नये.

<u>मंडळाचे अधिक्रमण-</u>

१८. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, मंडळावर लादलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यात मंडळाने कसूर केली आहे किंवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला आहे अशी राज्य शासनाची खात्री झाली तर, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, मंडळाच्या रचनेसाठी विहित केलेल्या रीतीने मंडळाचे अधिक्रमण करता येईल व त्याची पुनर्रचना करता येईल.

परंतु या पोट-कालमान्वये अधिसूचना काढण्यापूर्वी राज्य शासनाने मंडळाचे अधिक्रमण का करण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची मंडळास योग्य अशी संधी दिली पाहिजे व मंडळाची स्पष्टीकरणे व आक्षेप असल्यास त्यांचा विचार केला पाहिजे.

(२) मंडळाचे अधिक्रमण करण्यात आल्यानंतर व त्याची पुनर्रचना करण्यात येईतोपर्यंत या अधिनियमाखालील मंडळाचे अधिकार, त्याची कर्तव्ये व कामे ही मंडळाकडून किंवा राज्य शासन या कारणाकरीता नेमील अशा अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांकडून वापरण्यात किंवा पार पाडण्यात येतील.

नियम-

१९. (१) राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकाराच्या सामान्यतेस बाधा न आणता पुढील सर्व किंवा त्यापैकि कोणत्याही गोष्टीसाठी, असे नियम करता येतील :-

(अ) ज्या कालांतराने किंवा ज्या कालावधीच्या आत कलम ३ मध्ये उल्लेख केलेल्या रकमांपैकी कोणतीही रक्कम मंडळास किंवा निधीस देण्यात येईल ती कालांतरे व तो कालावधी, अशी रक्कम भरण्याची रीत आणि अशी कोणतीही रक्कम ज्या अभिकारणामार्फत व ज्या रीतीने वसूल करण्यात येईल ते अभिकरण व ती रीत;

(ब) कलम ३, पोट-कलम (३) अन्वये निधीचे हिशेब ज्या रीतीने ठेवले पाहिजेत व तपासले पाहिजेत ती रीत;

(क) कलम ७ अन्वये निधीतून अनुदाने देण्याची कार्यपद्धती;

(ड) निधीची व्यवस्था ठेवण्यासाठी झालेला खर्च भागविण्याची कार्यपद्धती;

(इ) कलम ४ अन्वये, मंडळावरील मालकांचे व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी, स्वतंत्र सदस्य व स्त्रीयांचे प्रतिनिधी यांची संख्या आणि त्यांना द्यावयाचे भत्ते असल्यास ते भत्ते;

(फ) ज्या रीतीने मंडळ आपले कामकाज चालवेल ती रीत;

(ग) निरीक्षकांची कर्तव्ये व अधिकार आणि या अधिनियमान्वये नेमलेला कल्याण आयुक्त व निरीक्षक यांच्या सेवेच्या शर्ती;

(ग-अ) मंडळाचे अधिकार व कामे कल्याण आयुक्तांकडे प्रत्यायोजित करणे आणि त्या शर्तीस व मर्यादेस अधीन राहून अशा अधिकारांचा वापर करता येईल किंवा अशी कामे करता येतील त्या शर्ती व मर्यादा;

(ह) मंडळास कर्मचारीवर्ग व इतर प्रशासकीय कर्मचारी यावर, निधीच्या वार्षिक उत्पन्नाच्या ज्या शेकडा प्रमाणापेक्षा अधिक खर्च करता येणार नाही ते शेकडा प्रमाण;

(आय) या अधिनियमान्वये ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख आणि मंडळाकडे पाठवावयाची विवरणे;

(ज) निधीतून ज्या कार्यास पैसा देण्यात येतो त्या कार्याचे प्रतिवृत्त आणि निधिचे उत्पन्न व खर्च यांचे विवरणपत्र व हिशेबांचे विवरणपत्र प्रसिद्ध करणे;

(के) या अधिनियमान्वये विहित करण्यात आली असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनीयमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे काबुल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे

कबूल होतील तर, अशा निर्णयाबाबतची अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपात अमलात येईल किंवा यथास्थिती तो अमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

<u>मंडळाचे सदस्य, कल्याण आयुक्त, निरीक्षक व मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे लोकसेवक असणे-</u>

२०. मंडळाचे सदस्य, कल्याण आयुक्त, निरीक्षक व मंडळाचे सर्व अधिकारी व नोकर हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

<u>सदभावनापूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण-</u>

२१. या अधिनियमान्वये सदभावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतु असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तिविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

<u>सूट-</u>

२२. राज्य शासनास मंडळाशी विचारविनिमय केल्यावर शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीन राहून कोणत्याही वर्गाच्या व्यापारी संस्थेस या अधिनियमाच्या सर्व तरतुदींपासून किंवा कोणत्याही तरतुदीपासून सूट देता येईल.

<u>सन १९३६ च अधिनियम ४ याच्या कलम ८ ची सुधारणा-</u>

२३. वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ याचे कलम ८, पोट-कलम (८) मध्ये स्पष्टीकरणापूर्वी पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :

“ परंतु मुंबई कामगार कल्याण निधि अधिनियम, १९५३, ज्या कोणत्याही कारखान्यास किंवा व्यापारी संस्थेस लागू असेल त्या कारखान्याच्या किंवा व्यापारी संस्थेच्या बाबतीत वसूल करण्यात आलेल्या अशा सर्व रकमा, उक्त अधिनीयमान्वये स्थापन केलेल्या निधीत भरण्यात येतील. ”

*****************